॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

OFFICE OF THE REGISTRAR

website: srtmun.ac.in
Email: registrar@srtmun.ac.in

जा. क्र.:आस्था /२/२०२६-२७/११८ दिनांक : १६ .१०.२०२६

# परिपत्रक

सर्व विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्य, विभागप्रमुख, अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांमध्ये विद्यार्थी परिषदेची स्थापना आणि निवडणुका घेण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने शासनाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी एकरूप परिनियम (Uniform Statutes) प्रसिद्ध केले आहेत. सदर परिनियमांच्या अंमलबजावणीतील आव्हाने, विविध घटकांशी सल्लामसलत करणे, विद्यार्थी परिषद निवडणुका पूर्णतः शैक्षणिक, निकोप व विद्यार्थी केंद्रित वातावरणात पार पाडण्यासाठी आणि पुढील दिशा निश्चित करण्यासाठी शासनाद्वारे माजी कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी एक उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. सदरील समितीतील सदस्य शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे येणार आहेत. या सदस्यांद्वारे विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका घेण्यासंदर्भात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्य, विभागप्रमुख, पदवीधर अधिसभा सदस्य / पदवीधर व्यवस्थापन परिषद सदस्य आदी घटकांशी सल्लामसलत/चर्चा करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि दि. २६ ऑक्टोबर, २०१८ च्या एकरुप परिनियमानुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणार आहेत. करिता विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्य, विभागप्रमुख, अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, आदींनी प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. अधिसभा सभागृह येथे दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहावे, ही विनंती.

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर दा. पवार
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**प्रति,**

१. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
२. सर्व संचालक, शैक्षणिक संकुले, विद्यापीठ मुख्य परिसर, प्रस्तुत विद्यापीठ (सदर परिपत्रकाचा आशय सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावा)
३. सर्व प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
४. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
५. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
६. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ
७. सिस्टिम एक्स्पर्ट , प्रस्तुत विद्यापीठ ( प्रत संकेतस्थळावर ठेवावी)

**प्रत माहितीस्तव:**

१. मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ .
२. मा. प्र -कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ .